# महाराष्ट्र शासन

क्रमांक:अशैसं-२००७/६६३/प्र.क्र.६२/०७/३५
सामान्य प्रशासन विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत,९ वा माळा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३.७.२००७

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट,
आर.सी.पटेल शैक्षणिक संकुल,
सुभाष कॉलनी, शिरपूर. जि.धुळे.

विषय :- शैक्षणिक संस्थेस धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा मिळणेबाबत.

महोदय,

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/०६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये आपण शैक्षणिक संस्थेस धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेल्या अर्जास अनुसरुन आपली संस्था धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

( प्र. मा. माळवदकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

16/07/07.

सोबत : ना-हरकत प्रमाणपत्र.

16/07/07

C. Patel [illegible] ional Trust, S[illegible]
Inward No. 09 / 2007-08
Received 13/07/2007
Signature

The Shirpur Education Society Shirpur
Inward No.
Received No.
Sign.

F:\old data\old d\BORDE-Borde Letter-4/61

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Competent Authority and Principal Secretary and Spl.Enquiry Officer-2**
General Administration Department
Mantralaya, Mumbai - 400 032.

No.ASS-2007/11/C.R.65/2007/35 Date :- 9th July, 2007.

## NO OBJECTION CERTIFICATE

R. C. Patel Educational Trust, R.C. Patel Shaikshanik Sankul, Subhash Colony, Shirpur, Dist. Dhule had applied for No Objection Certificate to their Institution as Linguistic Minority Educational Institution on 25/6/2007. The Scrutiny Committee appointed for the purpose, has done primary scrutiny of information given in the application and concerned documents enclosed with the application. On the basis of conclusion drawn by the Scrutiny Committee as well as the presentation made by the office-bearers of the institution during the hearing held before me on 3rd July, 2007 with concerned institution, I am satisfied that above mentioned institution is established and mantained by a person or group of persons from amongst the linguistic (Gujrathi) minorities declared by the State Government under the criteria determined vide Government Resolution, General Administration Department, No.ASS-2006/634/C.R.63/2006/35, dated 11th June, 2007. Consequently, it is hereby declared that the aforesaid institution is a Minority Educational Institution within the meaning of section 2 (g) of the National Commission for Minority Educational Institutions Act, 2004 and under Article 30 of the Constitution of India.

This No Objection Certificate shall stand for the Maharashtra State only. The linguistic minority status granted to above mentioned institution shall be applicable to all the educational units conducted by the institution.

The linguistic minority status granted to aforesaid educational institution shall be valid for three years from the academic year 2007-2008. It shall be mandatory for the concerned institution to fulfil expressly and specifically the criteria and conditions prescribed vide Government Resolution, General Administration Department, No.ASS-2006/634/C.R.63/2006/35, dated 11th June, 2007. If it is found that any of these criteria and conditions is violated, then the minority status so granted shall be cancelled.

GOVERNMENT OF MAHARASHTRA ★ GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT ★

**( SATYABIR S. DODD )**
Competent Authority and Principal Secretary
and Spl.Enquiry Officer-2
General Administration Department
Mantralaya, Mumbai - 400 032.

# महाराष्ट्र शासन
## सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००७/११/प्र.क्र.६५/२००७/३५ दिनांक :- ९ जुलै, २००७.

## <u>ना हरकत प्रमाणपत्र</u>

आर.सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट, आर.सी.पटेल शैक्षणिक संकुल, सुभाष कॉलनी शिरपूर, जि.धुळे या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.२५.६.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. या अर्जातील माहिती व अर्जासोबतच्या संबंधित कागदपत्रांची प्राथमिक छाननी, याकरिता नियुक्त केलेल्या छाननी समितीने केली. छाननी समितीच्या निष्कर्षानुसार तसेच दि. ३ जुलै, २००७ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या भाषिक (गुजराथी) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४ च्या कलम २ (छ) च्या अर्थानुसार व भारतीय संविधानाच्या कलम ३० अंतर्गत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे ना हरकत प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील तीन वर्षाकरिता विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील. या निकष व अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेचा अल्पसंख्याक दर्जा रद्द करण्यात येईल.

सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

(सत्यबीर सिंह डोड)
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२
सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.